रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ९५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ बुधवार, २२ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



## दीपावली शुभेच्छा!

मुंबई : दीपावलीनिमित्त महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी मंगळवारी शुभेच्छा दिल्या.

### राम प्रहर
### गुरुवारचा अंक नाही

दिवाळी पाडव्यानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास बुधवारी सुट्टी असल्यामुळे गुरुवार (दि.२३)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**

**–मुख्य संपादक**

# पनवेलमध्ये सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल स्वरांनी 'दिवाळी पहाट' रंगली





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीपावलीची सोनेरी पहाट आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल स्वरांची बरसात अशा द्विगुणित आनंदात पनवेलकर रसिकांनी मंगळवारी (दि. २१) 'दिवाळी पहाट'चा मंत्रमुग्ध अनुभव घेतला. निमित्त होते आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून पनवेल महापालिका आयोजित आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ प्रायोजित संगीत मैफिलीचे.

दीपावली म्हटली की दिव्यांचा, आनंदाचा आणि संस्कृतीचा सण. या सणानिमित्त विविध कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळते. त्यात सुरांच्या अविष्कारांनाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. पनवेलमधील निसर्गरम्य अशा वडाळे तलाव येथे झालेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमाने सप्तसुरांची उधळण करत नेहमीप्रमाणे येथील संस्कृतीमध्ये भर घातली.

सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे व श्री. जयदीप यांच्या गीतांना रसिकांनी भरभरून दाद दिली. त्याचबरोबर वाद्यवृंद समूहानेही आपल्या वादनातून उपस्थितांची वाहवा मिळवली. निवेदक विनित देव यांनी उत्तम निवेदन करत या कार्यक्रमात आणखी रंगत आणली. या वेळी वातावरण सात्विक व आल्हाददायी बनले होते. **(पान २ वर..)**

## वाशीत मध्यरात्री अग्नितांडव; चौघांचा मृत्यू, १० जण जखमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी सेक्टर १४ येथील एम.जी. कॉम्प्लेक्समधील रहेजा रेसिडन्सी या इमारतीत मंगळवारी (दि. २१) मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीमुळे नवी मुंबई हादरली. या दुर्दैवी घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत.

प्राथमिक माहितीनुसार मध्यरात्री १२ वाजून ४० मिनिटांनी इमारतीच्या दहाव्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये आग लागली. त्यानंतर अवघ्या काही वेळातच या आगीने रौद्ररूप धारण केले आणि वेगाने पसरत ११ आणि १२ या दोन्ही मजल्यांना कवेत घेतले. या दुर्घटनेत वेदिका सुंदर बालकृष्णन (६), कमला हिरल जैन (८४), सुंदर बालकृष्णन (४४) आणि पूजा राजन (३९) यांचा मृत्यू झाला. आगीत जखमी झालेल्या अग्रवाल, जैन आणि घोष कुटुंबातील सदस्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## राज्य सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई :** यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापूर्वी दोन हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत देण्याचा निर्णय होता. आता या मर्यादेत वाढ करून शेतकऱ्यांना तीन हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठीही विशेष बाब म्हणून आर्थिक मदत देण्याकरिता ६४८ कोटी १५ लाख ४१ हजार रुपयांच्या निधी वितरणाला तातडीने मान्यता देण्यात आली आहे.

## कामोठ्यात भीषण आगीमध्ये माय-लेकीचा होरपळून मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे सेक्टर ३६मधील एका निवासी इमारतीत मंगळवारी (दि. २१) पहाटे लागलेल्या भीषण आगीत आई व मुलीचा होरपळून मृत्यू झाला.


मिळालेल्या माहितीनुसार अंबे श्रद्धा इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये पहाटे अचानक शॉर्टसर्किटमुळे आग लागली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. याचदरम्यान दोन वेळा जोरदार स्फोटांचे आवाज आले. प्राथमिक अंदाजानुसार हे स्फोट सिलिंडरचे होते. आगीमुळे काही वेळातच संपूर्ण मजल्यावर आगीचे लोट व धूर पसरला.

रहिवाशांनी तातडीने पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाला कळवले. अग्निशमन गाड्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले, मात्र फ्लॅटमधील रेखा शिसोदिया (४५) आणि पायल शिसोदिया (१९) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. **(पान २ वर..)**









# रायगड जिल्हा परिषदेतील अपहार प्रकरणातील आरोपीची आत्महत्या

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागातील कोटयवधी रुपयांच्या अपहार प्रकरणातील आरोपी ज्योतिराम पांडुरंग वरुडे (वय ४८) यांनी विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केली. या घटनेमुळे रायगड जिल्हा परिषदेमध्ये खळबळ उडाली आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभाग आणि एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजनेत ४ कोटी १२ लाख रुपयांचा अपहार झाल्याची बाब या वर्षाच्या सुरवातीला समोर आली होती. या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात तीन कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता.

वेतन फरकाच्या रकम दाखवून आरोपी नाना कोरडे यांनी पाणी पुरवठा विभागातील सात कर्मचाऱ्यांच्या नावावर दीड कोटी रुपयांचा अपहार केल्याची बाब लेखा परिक्षणात समोर आली होती. यानंतर कोरडे यापुर्वी कार्यरत असलेल्या एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पाची खाते निहाय चौकशी करण्यात आली. यात नाना कोरडे, ज्योतिराम वरुडे आणि महेश मांडवकर यांनी चार कोटी १२ लाख रुपयांचा अपहार केल्याची बाब निदर्शनास आली होती. खातेनिहाय चौकशीनंतर या तिघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

ज्योतिराम पांडुरंग वरुडे (वय ४८) यांनी अलिबाग जवळील विद्यानगर येथे मेव्हण्याच्या घरी हे टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी विषारी द्रव्य प्राशन केले. त्यामुळे त्यांना उलटी होऊ लागली. नातेवाईकांनी तातडीने अलिबाग जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांची पत्नी अश्विनी वरुडे (वय ४७) यांनी अलिबाग पोलीसांना या घटनेची माहिती दिली. या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस तपास सुरू आहे.

### बोरघाटात मोटरसायकल घसरून दोन जण गंभीर

**खालापूर :** मुंबई-पुणे महामार्गावर बोरघाटात शिंग्रोबा मंदिराच्याविरुद्ध दिशेस असणाऱ्या खिंडीमध्ये अपघात दोन जण गंभीर जखमी झाले. स्पोर्ट्स बाईक घसरल्याने हा अपघात घडला. घटनास्थळी रुग्णवाहिका दाखल होत दोन्ही पेशंटना तत्काळ खोपोली येथील नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात व नंतर डॉक्टर जाखोटिया यांच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे, परंतु अतिरक्तस्राव झाल्याने व गंभीर जखमी असल्याने दोन्ही पेशंटला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे शिफ्ट केले आहे. जखमीपैकी एकाचे नाव सुरेश भोंडवे रा. प्रतिभा कॉम्प्लेक्स, खोपोली आहे. हा अपघात दुपारी ४ वा सुमारास घडला.

## बनावट नोटा प्रकरणातील आरोपी भूषण पतंगेच्या मृत्यूची सीआयडी चौकशी सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**



अलिबाग येथील बनावट नोटा प्रकरणातील आरोपी भूषण पतंगे याच्या मृत्यू प्रकरणाचा तपास आता सीआयडीकडे वर्ग झाला असून सीआयडीच्या पथकाने याचा तपास सुरू केला आहे. रविवारी सीआयडी पथकाने अलिबागमध्ये येवून याप्रकरणी प्राथमिक माहिती घेतली. दरम्यान भूषण पतंगे याचा मृत्यू न्यूमोनियामुळे झाल्याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त झाला आहे.

अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी आपल्या पथकासह ३ ऑक्टोबर रोजी अलिबाग शहरातील मयेकर वाडीमधील भूषण पतंगे याच्या घरावर छापा टाकला. या छाप्यात पोलिसांनी १२ लाख रूपयांच्या बनावट नोटा हस्तगत केल्या होत्या. याशिवाय नोटा छापण्यासाठी वापरला जाणारा कलर प्रिंटर, नोटा कापण्यासाठीचा कटर जप्त केला होता. भूषण पतंगे याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती. भूषण पतंगेच्या विरोधात अनेक गंभीर गुन्हे दाखल होते.

बनावट नोटा प्रकरणी उपनिरीक्षक दीपक मोरे तपास करीत होते. तपासादरम्यान भूषण पतंगे याची प्रकृती बिघडल्यामुळे त्याला आधी अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी मुंबईतील जे.जे. रुग्णालयात हलविण्यात आले. जे.जे. रुग्णालयात उपचार सुरू असताना शुक्रवारी भूषण पतंगे याचा मृत्यू झाला. तो न्यायालयीन कोठडीत होता.

भूषण पतंगे यांच्या मृत्यूनंतर अलिबाग पोलीसांच्या भोवती संशयाचे वादळ निर्माण झाले. पोलीसांनी केलेल्या मारहाणीत भूषण याचा मृत्यू झाला असावा, असा संशय व्यक्त करण्यात येत होता.

## बेपत्ता पर्यटकाचा मृतदेह माथेरान दरीत सापडला

**माथेरान :** मागील आठवड्यात माथेरानमधील हॉटेल वरांडा ईन द फॉरेस्टमधून बेपत्ता झालेले ५८ वर्षीय पर्यटकाचा मृतदेह एको पॉईंट जवळील दरीत सापडला आहे.

माथेरान मधील हॉटेल वरांडा ईन द फॉरेस्ट मध्ये सोम.दि.१३ ऑक्टो.ते शुक्र. दि.१७ ऑक्टो.पर्यंत राहत असलेले पर्यटक शानमुगा सुंदरम बालसुब्रमण्यम हे बुध.दि.१५ रोजी सकाळी फिरण्यासाठी हॉटेल बाहेर गेले असता ते पुन्हा आपल्या हॉटेल रूममध्ये परतले नाहीत. याबाबत हॉटेल व्यवस्थापनाकडून माथेरान पोलीस ठाण्यात पर्यटक बेपत्ता झाल्याची फिर्याद दाखल करण्यात आली होती.

या फिर्यादीनुसार येथील माथेरान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश गिरी तसेच पोलीस हवालदार गर्जे यांनी शोध मोहीम सुरू केली. यामध्ये त्यांना एको पॉईंट जवळ असलेल्या खोल दरीत बेपत्ता पर्यटकाचा मृतदेह सापडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पर्यटक शानमुगा सुंदरम बालसुब्रमण्यम हे एको पॉईंटजवळ खोल दरीच्या बाजूने फिरत असताना त्यांना ब्रेनस्ट्रोक या आजारामुळे चक्कर येऊन ते १२०० फूट दरीत कोसळले त्यामध्ये त्यांना गंभीर दुखापत होऊन ते मयत झाले.



**उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकापचे भोकरपाडा येथील प्रमुख कार्यकर्ते व माजी सरपंच जितेंद्र पाटील, उद्योगपती संजय पाटील, जयवंत सासे यांच्यासह नामदेव मालकर, पद्माकर पाटील, संतोष पाटील, नितेश पाटील, मोरेश्वर पाटील संतोष पाटील आदींनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.**

## वडखळ पोलिसांची मटका जुगारावर धाड; पैसे, साहित्य जप्त

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध मटका जुगार चालविणाऱ्या ठिकाणी केलेल्या छाप्यात एकाला अटक केली असून जुगारातील साहित्य जप्त करण्यात आले आहे. या कारवाईमुळे स्थानिक परिसरातील अवैध धंद्यांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वडखळ एसटी स्टँडच्या मागील भागात सार्वजनिक शौचालया जवळ मटका जुगार सुरू असल्याचे आढळले. त्यानुसार पोलिसांनी रात्री १०.४८ वाजता धाड टाकली. या कारवाईत चंद्रभूषण जितेंद्र सिंह यास रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपीकडून १६३० रुपये रोख, वहीतील नोंदी आणि मटका जुगाराशी संबंधित साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी वडखळ पोलिस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## रायगडातून ३८ हजारांचा मावा जप्त

**अलिबाग :** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हयात अन्न व औषध प्रशासन सतर्क झाले आहे. नागरीकांना सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार १८३ तपासण्यांमध्ये १७७ नमुने एफडीएने ताब्यात घेतले आहेत, तर चार दुकानदारांचे परवाने निलंबित केले आहेत. जिल्ह्यातून ३८ हजारांचा मावा जप्त करण्यात आला आहे.

दिवाळीच्या काळात मिठाई, खवा, मावा, खाद्यतेल, तूप आणि सुकामेवासारख्या पदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. याच संधीचा गैरफायदा घेत काही व्यावसायिक भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे पदार्थ विकतात. हे प्रकार रोखण्यासाठी रायगड अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने जिल्ह्यातील विविध मिठाईची दुकाने, किराणा दुकाने, गोदामांची तपासणी सुरू केली आहे. या तपासणीदरम्यान १७७ अन्नपदार्थांचे नमुने घेण्यात आले, तर दोन लाख १७ हजार ५०० रुपयांचा चक्रवाढ दंड आकारण्यात आला आहे, अशी माहिती रायगड अन्न व औषध प्रशासन विभागाचे उपायुक्त नितीन मोहिते यांनी दिली.

एफडीएने कारवाईवर लक्ष केंद्रित करणाऱ्यांबरोबर मिठाई, फरसाण उत्पादकांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा घेतल्या आहेत.चार कार्यशाळांमध्ये १८४ जणांनी सहभाग घेतला

## जाणीव संस्था, अभिनव युवक मित्र मंडळ आणि सखी महिला मंडळातर्फे दिवाळी फराळ वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नितीन जयराम पाटील, संस्थापक अध्यक्ष, जाणीव एक सामाजिक संस्था, अभिनव युवक मित्र मंडळ, सखी महिला मंडळ यांच्यातर्फे प्रभाग १८मधील वाल्मिकी नगर, अशोक बाग वस्ती, सिमरन मोटरच्या मागील आदिवासी वाडी, नवीन पनवेल येथील भीम नगर या ठिकाणी दिवाळीनिमित्त फराळाचे वाटप घरोघरी जाऊन करून तेथील नागरिकांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.



या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी यांची विशेष उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माजी नगरसेविका नीता माळी, भाजप पनवेल शहर महिला उपाध्यक्ष पल्लवी पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हा सदस्य सुधीर देसाई, पनवेल सरचिटणीस रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रीतम (पिंट्या) म्हात्रे, प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, दिव्यांग सेल अध्यक्ष राजा चव्हाण, शहर महिला चिटणीस संजीवनी खिल्लारे, महिला सदस्य जोत्स्ना माळी, लीना पाटील, सुवर्णा सहजराव, उपेंद्र मराठे, अभिनव युवक मित्र मंडळ अध्यक्ष अल्पेश पाडावे, सचिव सचिन नाझरे, शीतल संसारे, नरेंद्र सोनवणे, विजय डिसोजा, चंद्रकांत पाटील, राजू सावंत, सुभाष सहजराव, रमेश बैद, प्रमोद बैद, अमन मंगवाना, बंटी भगत, अभिषेक कदम, अनिकेत गुप्ता तसेच प्रभागातील कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली.

## पनवेलचा छत्रपती शिवाजी महाराज चौक दीपोत्सवाने उजळला; भाजपच्या केदार भगत यांचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळीचा पहिला दिवा छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी हे घोषवाक्य घेत पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक दीपोत्सवाने उजळला गेला. केदार भगत मित्र परिवाराच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.



या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, विरोधी पक्षनेते प्रितम जे.एम. म्हात्रे, माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, प्रभाकर बहिरा, प्रितम म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आणि शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, शहर मंडळाचे शेट्ये आदी उपस्थित होते. भाजप पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी, आपण आधी एक दिवा आईसाठी, एक दिवा स्त्रीसाठी असे अनेक उपक्रम राबविले असल्याचे सांगून महाराजांबद्दल असलेला आदर व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेषनाथ गायकर, ब्रिजेश बहिरा, यज्ञेश पाटील, चेतन म्हस्कर, सुमित दसवते, फिरोझ शेख, योगेश साळवी, हर्षद गडगे, राजेंद्र भगत, नितेश भगत, रवी पारचे, संतोष वर्तले, चिन्मय भगत, जयदीप भगत, संकेत दसवते, अभिषेक भालेकर, मयूर पाटील, भावेश शिंदे, सचिन जाचक, सचिन भगत, जयेश भगत, मंगेश भगत, निहाल म्हात्रे, ध्रुव भगत, गीतांजली भगत, संगीता पोतदार, निकिता पाटील, योगिता डांगरे, जिन्यासा भगत, सिमीन साळवी, अंकिता बहिरा, अवंती गडगे यांनी प्रयत्न केले.

## पान १ वरुन

### पनवेलमध्ये सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल स्वरांनी ‘दिवाळी पहाट’ रंगली







उदंड प्रतिसाद लाभलेल्या या दिवाळी पहाट कार्यक्रमाची सुरुवात सूर निरागस हो गणपती या गीताने झाली. पुढे कानडा राजा पंढरीचा, वाहतो या इथे ज्ञानरूपी झरा, धुंद होते शब्द सारे, आज म्हारे घर आओ, पांडुरंग नामी लागला ध्यास, मन उधाण वाऱ्याचे, स्वर सुखाची सावली, ओल्या सांजवेळी, उरले उरात काही, शारद सुंदर, मला वेड लागले प्रेमाचे, आता वाजले की बारा, अप्सरा अशी एकाहून एक सरस गाणी सादर झाली, तर समारोप पसायदानाने झाला. या सुरेल मैफिलीचा पनवेलकरांनी कुटुंबासह व मित्रपरिवारासमवेत मनमुराद आनंद घेतला.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मान्यवर म्हणून प्रमुख उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जेष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, प्रांताधिकारी पवन चांडक, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, भाजपचे माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष गणेश कडू, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ यांच्यासह विविध संस्था संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

सुंदरशा व्यासपीठावर मागे देवीचे रूप आणि पैठणीचा साज विशेष आकर्षणे होती. त्याचबरोबर रसिकांसाठी ४५०० हजार खुर्च्यांची आसन व्यवस्था करण्यात आली होती. रेकॉर्डब्रेक रसिकांची गर्दी झाल्याने आसनव्यवस्था पूर्णपणे भरून गेली. त्यामुळे रसिकांनी परिसरात भेटेल त्या जागी काहींनी बसून, तर काहींनी उभे राहून या कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला. उत्तम आयोजन आणि संयोजनात झालेल्या यंदाच्या या ‘दिवाळी पहाट’चे नववे वर्ष होते. या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले.

**पनवेलकर सांस्कृतिक वारसा जपणारे आहेत. त्यामुळे त्यांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. मी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर आणि समस्त पनवेलकरांचे आभार मानते. सुंदर ‘दिवाळी पहाट’चे आयोजन आणि चांगला रसिकवर्ग असल्याने पुन्हा पुन्हा यावे असे मनापासून वाटते.**

**-बेला शेंडे, सुप्रसिद्ध गायिका**

**पनवेल सांस्कृतिक चळवळ जपणारे आहे. आजच्या कार्यक्रमाला पाच हजारांहून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे कार्यक्रमाची जागा अपुरी पडली. अशाच प्रकारच्या उपक्रमांद्वारे आपण पनवेलची सांस्कृतिक चळवळ अधिक वृद्धिंगत करत राहू. उदंड प्रतिसादाबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार!**


**-परेश ठाकूर, माजी सभागृहनेते, पनवेल महापालिका**

### कामोठ्यात भीषण आगीमध्ये माय-लेकीचा होरपळून मृत्यू

घटनेची माहिती मिळताच आमदार प्रशांत ठाकूर यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत आपत्कालीन यंत्रणांना तातडीने मदतकार्य करण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान, प्राथमिक तपासात शॉर्टसर्किटमुळे लागलेली आग सिलिंडर स्फोटामुळे आणखी भीषण बनली असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अग्निशमन दल आणि पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा सुरू आहे. नेमके कारण लवकरच समोर येईल, असे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

# रायगडात ऐन दिवाळीत जोरदार पावसाची हजेरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाची तयारी सुरू असताना मंगळवारी (दि.२१) सायंकाळी रायगड जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची एकच तारांबळ उडाली. या पावसामुळे दिवाळीच्या उत्साहावर पाणी पडले.

मंगळवारी सकाळपासून सर्वत्र आभाळ निरभ्र आणि कडकडीत ऊन पडले होते. दुपारनंतर आकाशात ढगांची गर्दी व्हायला सुरुवात झाली. संध्याकाळी अचानक जोरदार पाऊस सुरू झाला. या पावसामुळे शहरी भागातील व्यापाऱ्यांना फटका बसला. दिवाळीनिमित्त लागणाऱ्या वस्तू, फुले विक्रेते यांच्यावर आपला व्यवसाय बराच काळ बंद ठेवण्याची वेळ आली. काहींच्या सामानाचे नुकसान झाले. दिवाळीनिमित्त खरेदीसाठी बाजारात आलेल्या ग्राहकांनाही पावसाने भिजवून टाकले.

रायगड जिल्ह्याच्या सर्वच भागात कमी अधिक प्रमाणात पाऊस झाला. जोरदार वारे, ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना पुन्हा एकदा फटका बसला आहे. शेतात कापून ठेवलेले भातपीक पावसामुळे भिजले आहे.
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

## संपादकीय

# खबरदारीची गरज

दीपावलीच्या मंगलमय सणामुळे राज्यभरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण आहे. अशा या चैतन्याने भारावलेल्या वातावरणात एखाद्या दुर्घटनेची बातमी येते तेव्हा ती अधिकच वेदनादायी वाटते आणि हे टाळता आले असते तर बरे झाले असते अशी भावना दाटून येते. वाशी आणि कामोठे येथे घडलेल्या आगीच्या घटनांमध्ये तीन कुटुंबांतील एकूण सहा जणांचा बळी गेल्याने परिसरावर दु:खाची छाया पसरली असून आगीच्या घटना टाळण्यासाठी सगळ्यांनीच आवश्यक खबरदारी घ्यायला हवी.

**सगळा परिसर दिवाळीच्या उत्साही उत्सवात रंगून गेलेला असतानाच मंगळवारी मध्यरात्री वाशीतील सेक्टर १४ येथील एमजी कॉम्प्लेक्सच्या दहाव्या मजल्यावर आग लागली. या आगीत एकूण चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर पनवेल नजीकच्या कामोठे येथे सेक्टर ३६मधील अंबेश्रद्धा इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर सोमवारी पहाटे अचानक लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील आई आणि मुलगी जळून मृत्यूमुखी पडली. दिव्यांची आरास, आकाशकंदील, विद्युतरोषणाई आणि फटाके हे सारेच प्रकाशाचा उत्सव असलेल्या दिवाळीचा अविभाज्य आहेत. दीपावलीच्या अवघ्या लखलखाटाने आपली अंतर्मने देखील उजळून निघतात म्हणूनच आपण सगळेच उत्साहाने आपापला परिसर दिव्यांनी, रोषणाईने सजवण्यात रंगून जातो. हे सारे करत असताना आपण आपल्यापरीने सुरक्षिततेची खबरदारीही घेतो, परंतु काही वेळेला कुठेतरी काहीतरी नकळत चुकते किंवा कुणाच्या तरी बेपर्वाईमुळे दिवाळीच्या माहौलात आगीच्या घटना कानावर येतात, परंतु सोमवारी आणि मंगळवारी अनुक्रमे कामोठे आणि वाशी येथे घडलेल्या आगीच्या घटनांमध्ये प्रथमदर्शनी तरी दिवाळीचा काही संबंध असल्याचे समोर आलेले नाही. तरीही दिवाळीच्या दिवसांत नजीकच्या परिसरांत आगीच्या एका पाठोपाठ दोन घटना घडल्याने नागरिकांना खबरदारीचे आवाहन करण्यात आले आहे. मंगळवारी मध्यरात्री वाशीतील सेक्टर १४ येथील एमजी कॉम्प्लेक्सच्या दहाव्या मजल्यावर आग लागली. या आगीत एकूण ४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्याआधी सोमवारी सकाळी पावणेसहाच्या सुमारास कामोठे येथे सेक्टर ३६मधील अंबेश्रद्धा इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर लागलेल्या आगीत आई आणि मुलगी जळून मृत्यूमुखी पडल्या. वाशीतील इमारतीतील आग ही शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. दहाव्या मजल्यावर लागलेली ही आग अकराव्या आणि बाराव्या मजल्यापर्यंत पसरली. आगीत दहाव्या मजल्यावरील सदनिकेतील एका ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला, तर बाराव्या मजल्यावरील एकाच कुटुंबातील पती, पत्नी आणि त्यांच्या सहा वर्षांच्या मुलीचाही या घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला. कामोठे येथील घटनेत घरातील दोन गॅस सिलेंडरचा स्फोट आणि दाट धूर यांमुळे आई व मुलगी यांचा घटनास्थळी होरपळून मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. कुटुंबातील अन्य सदस्य कामानिमित्त बाहेर गेलेले असल्याने ते या दुर्घटनेतून बचावले. आगीच्या कारणाचा तपास सुरू असून गॅस गळतीमुळे ही दुर्घटना घडली असावी असा अंदाज आहे. ऐन दिवाळीतील या दोन दुर्दैवी घटनांमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या दोन्ही दुर्दैवी घटनांमध्ये वरकरणी तरी दिवाळीतील फटाक्यांचा वा रोषणाईचा संबंध नसला तरी सगळ्यांनीच दिवाळी साजरी करताना स्वत:च्या व आसपासच्या कुटुंबांच्याही सुरक्षिततेची खबरदारी घेतली पाहिजे. उंच इमारतींमध्ये आगीच्या घटना घडल्यानंतर घ्यावयाच्या सुरक्षिततेच्या खबरदारीविषयी नागरिकांमध्ये जागरुकतेचा मोठा अभाव दिसतो. सगळ्यांनीच त्याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे.**

# बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा सण भाऊबीज

भाऊबीज हा बहीण-भावाच्या नात्याचा खास सण आहे. या दिवशी बहीण आपल्या प्रिय भावाला ओवळते आणि त्याच्या दीर्घायुष्य आणि आनंदी जीवनासाठी प्रार्थना करते. पुराणानुसार या दिवशी यमदेव आणि यमुना नदीची पूजा करण्याची परंपरा आहे. चला, तर मग पाहूया भाऊबीज २०२५ची नेमकी तारीख आणि या सणाशी संबंधित काही महत्त्वाच्या गोष्टी.



भाऊबीज साजरा करण्यामागे अनेकदा एक कथा सांगितली जाते. हा सण यमुना आणि यम यांच्यातील प्रेमाचे प्रकटीकरण आहे, जो आता प्रत्येक भाऊ आणि बहिणीसाठी खास आहे. असेही म्हटले जाते की याच दिवशी यमुना मातेने तिचा भाऊ यमाला वचन मागितले होते की, हा सण दरवर्षी कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जाईल. शिवाय जर या दिवशी भाऊ आणि बहिणीने यमुनेत एकत्र स्नान केले आणि भाऊ त्याच्या बहिणीच्या घरी जेवण केले, तर तो अकाली मृत्यूच्या भीतीपासून मुक्त होईल. तेव्हापासून ही परंपरा चालत आली आहे.

भाऊबीजचा सण हा केवळ एक विधी नाही तर एक भावना आहे. भावा-बहिणीच्या नात्यातील प्रेम प्रत्येकासाठी आवश्यक आहे. म्हणून बहिणी हा सण मोठ्या आनंदाने साजरा करतात. प्रथम त्या स्नान करतात, नंतर कथा म्हणतात आणि पूजा करतात. त्यानंतर त्या त्यांच्या भावाला तिलक लावतात आणि त्याला दीर्घायुष्याची कामना करतात. यामुळे त्याचे महत्त्व आणखी वाढते.

या दिवशी यम आपली बहीण यमी हिच्या घरी जेवायला गेला म्हणून या दिवसाला यमद्वितीया असे नाव मिळाले. भावाला निरोप देताना यमुनेने नारळ दिला. यमराजांनी कारण विचारले, तेव्हा यमुना म्हणाली की, हा नारळ तुम्हाला माझी आठवण करून देत राहील. यामुळे काही ठिकाणी भाऊला नारळ देण्याची परंपरा सुरू झाली.

बंधू-भगिनींचा प्रेमसंवर्धनाचा हा दिवस आहे. या दिवशी बहिणीच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीच्या ताटात 'ओवाळणी' देऊन बहिणीचा सत्कार करतो. भावा-बहिणीच्या नात्याचा एक तरी सण प्रत्येक समाजात असतोच.

भाऊबीजेच्या दिवशी चित्रगुप्ताची पूजा होते. हा दिवस कायस्थ समाजाचे लोक चित्रगुप्ताची जयंती म्हणून साजरा करतात.

भाऊबीज हा हिंदूधर्मीय भाऊ-बहीण साजरा करीत असलेला एक सण आहे. हा सण कार्तिक शुद्ध द्वितीया (यमद्वितीया) या दिवशी असतो. हा महाराष्ट्रीय पद्धतीच्या दिवाळीतला सहावा दिवस असतो. या सणास हिंदीत भाईदूज म्हणतात.

भाऊबीज या दुसऱ्या दिवशीपासून आप्तेष्ट, जवळचे नातलग, पै पाहुणे, शेजारी, आपल्या घरी काम करणारी कामगार असोत, वा इतर कोणी असो या सर्वांना आदराने आणि प्रेमाने फराळ पाण्यासाठी बोलावले जाते. काही ठिकाणी आगोदरही आमंत्रण दिल्या जाते, परंतु भाऊबीजेपर्यंत प्रत्येकाच्या स्वतःच्या घरी कार्यक्रम असल्याकारणाने लोक घरी या दरम्यान जात नाहीत, म्हणून भाऊबीजची यानंतर फराळाला बोलावण्याची प्रथा चालू आहे.

भाऊबीज उत्सवातील शेवटचा दिवस असतो. हा दिवस भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक मानला जातो. या दिवशी बहीण ही भावाचे औक्षण करते. त्याचे दीर्घायुष्य, आरोग्य आणि प्रगतीसाठी प्रार्थना करते.

हिंदू कॅलेंडरनुसार भाऊबीज कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या दुसऱ्या दिवशी साजरी केली जाते. रक्षाबंधनासारखाच हा दिवस बहीण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक मानला जातो. या दिवशी बहीण आपल्या भावाला टिळक लावून ओवळते, तर भाव त्यांना भेटवस्तू देतो.

कार्तिक शुक्ल पक्षाचा दुसरा दिवस २२ ऑक्टोबर रोजी रात्री ८.१६ वाजता सुरू होतो आणि २३ ऑक्टोबर रोजी रात्री १०.४६ वाजता संपेल. परिणामी भाऊबीज २३ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाईल. शुभमुहूर्त (भावाला ओवळण्यासाठी) दुपारी १.१३ ते ३.२८ वाजता आहे. या दिवशी भावाला ओवाळून त्याच्या दीर्घायुष्याची आणि सुखी जीवनाची प्रार्थना करणे अत्यंत मंगलमय मानले जाते.

भाऊबीजच्या दिवशी भावाने पूर्वेकडे तोंड करून बसावे. टिळक लावण्यासाठी भावाच्या डोक्यावर अक्षता टाकावी. त्याला सुपारी आणि सोन्याचे दागिने ओवळावे. साखर किंवा मिठाई देऊन तोंड गोड करावे. शेवटी दिव्याने आरती करावी.

भाऊबीजेचा सण प्रत्येक भाऊ-बहिणीसाठी खूप खास असतो. हा दिवस नात्यातील गोडवा आणि आपलेपणाचे प्रतीक आहे. दिवाळीनंतर काही दिवसांनी येणाऱ्या या सणाचे विशेष महत्त्व आहे. बहीण ही भावाचे औक्षण करून त्याच्या दीर्घायुष्यासाठी, प्रगतीसाठी आणि आनंदासाठी प्रार्थना करते. या दिवशी बहीण आपल्या भावाला टिळा ओवाळते, त्याला खास पदार्थ खाऊ घालते, पण तुम्हाला माहीत आहे का, वास्तुशास्त्रानुसार औक्षण करण्यासाठी बसण्याच्या दिशेला खूप महत्त्व आहे?

कोणत्या दिशेला तोंड करून भाऊ बसलाय, याचा त्याच्या आयुष्यावर आणि दोघांच्यातील नात्यावर थेट परिणाम होतो, असे मानले जाते. त्यामुळे या भाऊबीजेला जर तुम्हाला वाटत असेल की भावाच्या जीवनात सकारात्मकता, प्रगती आणि चांगले आरोग्य कायम राहावे, तर वास्तुचे हे खास नियम जाणून घ्या. ज्योतिष आणि वास्तुशास्त्राचे अभ्यासक अंशुल त्रिपाठी यांनी याबद्दल माहिती दिली आहे.

वास्तुशास्त्रानुसार ओवाळताना भावाला उत्तर किंवा पूर्व दिशेकडे तोंड करून बसवावे. उत्तर दिशा ही धन आणि संधींची दिशा मानली जाते. या दिशेला औक्षण केल्याने भावाच्या करिअरमध्ये आणि आर्थिक जीवनात स्थिरता येते.

पूर्व दिशा ज्ञान, बुद्धी आणि सकारात्मक ऊर्जेची दिशा मानली जाते. या दिशेकडे तोंड करून औक्षण-नाम लावल्यास नात्यात समज आणि प्रेम वाढते. घरात जागेची कमतरता असेल किंवा दिशेबद्दल शंका असेल, तर तुम्ही मोबाईल कंपासने नेमकी दिशा पाहू शकता.

बहिणीने कोणत्या दिशेला बसावे – भाऊ उत्तर किंवा पूर्वेकडे पाहत असेल, तेव्हा बहिणीने दक्षिण किंवा पश्चिम दिशेकडे तोंड करून बसावे. यामुळे ऊर्जेचा समतोल व्यवस्थित राहतो आणि टिळक लावण्याची विधी शुभ मानली जाते.

कुंकवाचा टिळा लावणे सर्वात शुभ मानले जाते. लाल रंग ऊर्जा, साहस आणि प्रेमाचे प्रतीक आहे. हवे असल्यास तुम्ही थोडे तांदूळ (अक्षत) मिसळूनही टिळक लावू शकता. हा टिळक भावाच्या आयुष्यात स्थिरता आणि प्रगती आणतो.

औक्षण करताना मनात शुभ विचार आणि आशीर्वाद ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. भावाच्या दीर्घायुष्यासाठी, प्रगतीसाठी आणि सुख-शांतीसाठी प्रार्थना करा. तुम्ही मनातल्या मनात सौभाग्यवती भव किंवा आयुष्मान भव असे आशीर्वादाचे शब्द बोलू शकता.

औक्षण झाल्यावर लगेच दिशा बदलू नये, भावाने थोडा वेळ त्याच दिशेला बसून राहावे. यामुळे त्या दिशेची सकारात्मक ऊर्जा पूर्णपणे स्वीकारली जाते. त्यानंतर बहिणीने भावाला मिठाई खाऊ घालावी.

कोणत्या दिशेला बसू नये वास्तूनुसार, टिळक लावताना भावाने दक्षिण-पश्चिम (नैऋत्य) किंवा पश्चिम-दक्षिण दिशेकडे तोंड करू नये. ही दिशा जडपणा आणि अडथळ्यांचे संकेत देते. अशा दिशेला टिळक लावल्याने मन खिन्न होण्याची किंवा भांडणांची शक्यता वाढू शकते.

भाऊबीज हा फक्त ओवाळण्याचा नव्हे, तर भावनांना जोडण्याचा काळ आहे. या दिवशी वास्तुशास्त्रानुसार दिशा आणि ऊर्जेची काळजी घेतली, तर भाऊ-बहिणीचे नाते अधिक मजबूत होते. योग्य दिशेला बसून औक्षण केवळ भावाचे आयुष्यच वाढत नाही, तर कुटुंबात सुख, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जाही टिकून राहते, असे मानले जाते.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# नेक्सजेन मोबिलिटी शोमध्ये नवकल्पनांची भरारी

भविष्यातील हायपरलूपपासून अत्याधुनिक रोबोपर्यंतच्या नवकल्पनांची भरारी 'सीआयआय'च्या वतीने आयोजित 'नेक्सजेन मोबिलिटी शो'मध्ये पहायला मिळाली. या प्रदर्शनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह नवउद्यमींनी नवीन तंत्रज्ञानाच्या सादरीकरणातून भविष्याचे चित्र सर्वांसमोर मांडले.



'नेक्सनेज मोबिलिटी शो'ची यंदा नावीन्यता, एकत्रितता आणि परिणाम ही संकल्पना होती. नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाची मांडणी, सध्याच्या व्यवस्थेत त्यांचे एकत्रीकरण आणि त्या माध्यमातून भविष्यात होणारा परिणाम असा उद्देश यामागे होता. नवउद्यमींसह विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सादरीकरण केले. त्यात हायपरलूप, अग्निशमनासह संकटातील नागरिकांची सुटका करणारे रोबो, उंच इमारतींची सफाई करणारे ड्रोन अशा प्रकारचे भविष्यवेधी तंत्रज्ञान मांडण्यात आले. याचबरोबर वाहन उद्योगाशी निगडितही नवतंत्रज्ञानाची मांडणी करण्यात आली.

पुण्यातील 'क्लिनट्रान्स' या नवउद्यमी कंपनीने स्वच्छतेसह गोदामातील मालाचे व्यवस्थापन करणारे रोबोचे सादरीकरण केले. 'कार्गोएफएल'ने कृत्रिम प्रज्ञाआधारित मालवाहतूक यंत्रणेचे चित्र उलगडून दाखविले. 'नावे डिकॅल सर्व्हिसेस'ने 'मिनीएचर ३डी मॉडेल' मांडली होती. भोसरीतील 'एआयसी पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशिप फोरम'ने यात नावीन्यपूर्ण उत्पादने सादर केली. 'बोरसे ऑटोमोटिव्ह'ने स्वयंचलित वाहन सादर केले. हे वाहन औद्योगिक वापरांसाठी तयार करण्यात आले आहे. याचबरोबर 'स्मार्ट ट्रॅक्टर'ही सादर केला.

'सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'मधील विद्यार्थ्यांनी संरक्षण आणि मदत कार्यासाठी चालकविरहित 'रोव्हर'चा नमुना सादर केला. त्यात फेस रिक्गनिशन, ऑब्जेक्ट रिक्गनिशन आणि ट्रॅकिंग अशा तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. 'व्हीआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग'मधील विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिक बोटीचा नमुना सादर केला. 'जेएसपीएम'मधील विद्यार्थ्यांनी उंच इमारतीच्या खिडक्यांची सफाई करणाऱ्या ड्रोनचे सादरीकरण केले. अजिंक्य डी. वाय. पाटील युनिर्व्हसिटीतील विद्यार्थ्यांनी हायपूरलूपचा नमुना सादर करून भविष्याची झलक दाखविली. अनेक नवउद्यमी कंपन्यांनी वाहन उद्योगाशी निगडित चाचणी उत्पादने व अंतिम नमुने सादर केले.

# साहित्यिक ना.सी. फडके

## निमित्त



नारायण सीताराम फडके हे युगप्रवर्तक मराठी कादंबरीकार, कथाकार, मराठी लघुनिबंधाचे आद्य प्रवर्तक आणि साहित्य समीक्षक. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

फडके यांचा जन्म ४ ऑगस्ट १८९४ रोजी नगर जिल्ह्यातील कर्जत या ठिकाणी झाला. त्यांचे वडील सीताराम फडके हे वेदान्ती होते. वेदान्तनिदर्शन (१९१३) हा व्यासंगपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. फडक्यांचे प्राथमिक शिक्षण वडूज (जि. नाशिक), बार्शी (जि. सोलापूर), पुणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी, तर माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेजात झाले. १९१७ साली ते एम.ए. झाले. तत्पूर्वीच, १९१६ मध्ये न्यू पूना कॉलेजात (आजचे स.प. महाविद्यालय) प्राध्यापक झाले.

'मेणाचा ठसा' ही फडके यांची पहिली कथा केरळ कोकिळ मासिकात प्रसिद्ध झाली (१९१२). 'अल्ला हो अकबर!' (१९१७) ही त्यांची पहिली कादंबरी. मारी कोरेली या इंग्रज कादंबरीकर्तीच्या टेंपरल पॉवर या कादंबरीच्या आधारे ती लिहिलेली आहे. त्यानंतर त्यांनी अनेक कथा आणि कादंबऱ्या लिहिल्या, मात्र कादंबरीलेखन हे त्यांचे विशेष कर्तृत्वाचे क्षेत्र ठरले. कला ही कलेसाठीच असते वाचकांना सौंदर्यदर्शन घडविणे व आल्हाद देणे हेच कादंबरीकाराचे प्रमुख कार्य या भूमिकेतून त्यांनी प्रमाणबद्ध, आटोपशीर आणि लाघवयुक्त कादंबऱ्यांचे एक युगच मराठीत सुरू केले. 'कुलाब्याची दांडी' (१९२५), 'जादूगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१), 'निरंजन' (१९३२) ह्या त्यांच्या आरंभीच्या कादंबर्यांतील प्रणयरम्यता, कुशल, सफाईदार व्यक्तिरेखन, चतुर संवाद आणि मोहक भाषाशैली या गुणांनी वाचकांच्या मनांची पकड घेतली.

यानंतरच्या 'उद्धार' (१९३५), 'प्रवासी' (१९३७), 'अखेरचं बंड' (आवृ. दुसरी, १९४४) या महत्त्वाच्या कादंबऱ्यांतून प्रणयरम्यतेला त्यांनी गंभीर विषयांची जोड दिली आणि महाराष्ट्रातील काही असामान्य व्यक्तिमत्त्वांचे दर्शन त्यांतून घडविले. तथापि हे करीत असताना कल्पितालाही त्यांनी वाव दिला आणि ह्या कादंबऱ्या 'चरित्रात्मक' होऊ दिल्या नाहीत. 'बेचाळीसचे पत्रीसरकार' (झंझावात, १९४८), 'काश्मीरचे स्वातंत्र्योत्तर राजकारण' (जेहम, १९४८), 'गोवामुक्तीचे आंदोलन' (उजाडलं! पण सूर्य कुठे आहे? १९५०) अशा काही कादंबऱ्या त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

'ऋतुसंहार' (१९५८), 'कुहू! कुहू!' (१९६०), 'ही का कल्पद्रुमांची फळं?' (१९६१), 'एक होता युवराज' (१९६४) या त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्यांपैकी काही होत. त्यांच्या काही कादंबऱ्यांचे आणि कथांचे इंग्रजी आणि इतर भारतीय भाषांतून अनुवादही झालेले आहेत. कलंक शोभा (१९३३) या त्यांच्या कादंबरीवरून मराठी चित्रपटही काढण्यात आला होता. फडके यांची तंत्रनिष्ठ कलादृष्टी त्यांच्या कथांतून मोठ्या प्रमाणात दिसते. त्यांच्या कथांचे पंचविसांहून अधिक संग्रह प्रकाशित झालेले असून त्यांच्या काही प्रातिनिधिक कथा बावनकशी (१९६२) या नावाने संग्रहित केलेल्या आहेत. अशा या महान साहित्यिकाचे २२ ऑक्टोबर १९७८ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दिवाळीतील अभ्यंगस्नानाचे आरोग्यदायी महत्त्व

दिवाळी म्हटलं की प्रत्येकाला दिवाळीचा फराळ, मिठाई आणि फटाके आठवतात, पण यात आणखी एक गोष्ट अशी आहे, जी दिवाळीमध्ये आवर्जून केली जाते आणि ती म्हणजे अभ्यंगस्नान. दिवाळीला अभ्यंगस्नानाची परंपरा आहे. पहाटे उठून अंगाला तेल व उटणे लावून, मग अंघोळ केली जाते आणि त्यालाच अभ्यंगस्नान, असे म्हणतात. आयुर्वेदामध्ये अभ्यंगस्नानाला फार महत्त्व आहे. त्याला गंगा स्नान, थैला स्नान असेही म्हणतात.



सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट रुजुता दिवेकर यांनी इन्स्टाग्रामवर एका पोस्टमध्येदेखील सांगितले की, गरम पाण्याने अंघोळ करण्यापूर्वी शरीराला तीळ तेल आणि औषधी वनस्पतींचे तेल लावले जाते, कारण ते हिवाळ्यासाठी रोगप्रतिकारशक्ती वाढवणे, वात कमी करणे आणि त्वचेला चांगले पोषण देते. शिवाय गरम तेल आणि गरम पाण्याच्या अंघोळीमुळे मिळणाऱ्या उबदारपणाने रक्ताभिसरण वाढवते, स्नायूंना आराम देते आणि शरीराला चैतन्य देते

रेजुआ एनर्जी सेंटर ॲक्युपंक्चर आणि निसर्गोपचारचे डॉ. संतोष पांडे यांनी अभ्यंगस्नानाचे फायदे नोंदवले आहेत.

त्वचेला ओलावा : उबदार तेल त्वचेमध्ये प्रवेश करते. त्यामुळे त्वचेतील ओलावा टिकून राहतो. विशेषत: हिवाळ्यात जेव्हा त्वचा कोरडी आणि रुक्ष होते तेव्हा त्वचेचा कोरडेपणा दूर होण्यास यामुळे मदत होते.

रक्ताभिसरणात वाढ : कोमट तेलाने मसाज केल्याने रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते, ज्यामुळे त्वचेच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. चांगले रक्ताभिसरण म्हणजे त्वचेच्या पेशींना पोषक ऑक्सिजनचा पुरवठा सुधारणे.

अकाली वृद्धत्व टाळण्यास मदत : नियमित तेल लावून अंघोळ केल्याने त्वचेला चांगले पोषण मिळते आणि लवचिकता वाढवून वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते.

नैसर्गिक तेज : या विधीमध्ये वापरण्यात येणारे तेल हे बहुतेक वेळा तिळाचे तेल किंवा खोबरेल तेल यांसारख्या नैसर्गिक घटकांसह तयार केलेले असते, जे त्वचेला नैसर्गिक तेज देण्यास मदत करते.

आराम मिळतो : अभ्यंगस्नानाने शारीरिक फायदे मिळण्यासह मानसिक विश्रांतीही मिळते तसेच या स्नानाने तणाव कमी होऊन, मन शांत होते आणि निरोगीपणाची भावना वाढते.

# जेएनपीए बंदरात चीनमधून तस्करीने आलेले फटाके जप्त

**उरण : प्रतिनिधी**



जेएनपीए बंदरातुन तस्करीच्या मार्गाने चीनमधून कपड्यांच्या बनावट नावाखाली पाठविण्यात आलेले चार कोटी ८२ लाख रुपये किमतीचे फटाके महसूल गुप्तचर संचालनालयाने जप्त केले आहेत. ऑपरेशन फायर ट्रेल अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत ४६६४० फटाके जप्त करण्यात आले असून या प्रकरणी एका संशयिताला अटक केली आहे.

जेएनपीटीए बंदरामार्गे चीनमधुन एका ४० फूट लांबीच्या कंटेनरमध्ये चार कोटी ८२ लाख रुपये किंमतीचे ४६६४० फटाके लेगिंग्ज घ्या बनावट नावाखाली पाठविण्यात आले होते.याची बित्तंबातमी खबऱ्याकडून मिळाल्यानंतर महसूल गुप्तचर संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी तपासाला सुरुवात केली होती. या तपासणीत एक ४० फुटी लांबीच्या कंटेनरबाबत संशय आल्याने संशयित कंटेनर ताब्यात घेतला. अधिक तपास करताना कंटेनरच्या पुढील बाजूस ठेवलेल्या कपड्यांच्या थरामागे लपवलेले ४६६४० फटाके आणि फटाक्यांचे साहित्य आढळले.

या मालाची एकूण किंमत ४.८२ कोटी रुपये आहे. चीनमधून जेएनपीए बंदरामार्गे आयसीडी अंकलेश्वरला पाठविण्यात येणार होता, मात्र महसूल गुप्तचर संचालनालयाने चिनी बनावटीचे फटाके आणि फटाक्यांच्या साहित्याचा बेकायदेशीर आयातीचा एक अत्याधुनिक तस्करीचा प्रयत्न हाणून पाडला.

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या अधिकाऱ्यांना झडतीदरम्यान तस्करी करणाऱ्या टोळीच्या कार्यपद्धतीचा खुलासा करणारी अनेक महत्त्वपूर्ण कागदपत्रे जप्त केली आहेत तसेच गुजरातमधील वेरावळ येथून या प्रकरणातील एका मुख्य आरोपीला अटकही करण्यात आली आहे. फटाक्यांची आयात ही परराष्ट्र व्यापार धोरणातील आयटीसी (एचएस) वर्गीकरणानुसार प्रतिबंधित आहे. अशा धोकादायक वस्तूंच्या बेकायदेशीर आयातीमुळे सार्वजनिक सुरक्षा, राष्ट्रीय सुरक्षा, बंदराच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना आणि व्यापक नौवहन आणि लॉजिस्टिक्स साखळीला गंभीर धोका निर्माण होतो. त्यामुळे महसूल गुप्तचर संचालनालयाने ऑपरेशन फायर ट्रेल अंतर्गत जप्तीची कारवाई करण्यात आली असल्याचे सांगितले.

# सुकापूर येथे विविध विकासकामांचे शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



केंद्र आणि राज्य सरकार नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे सरकार या योजनाराबवत असले तरी त्या सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहचवणे महत्वाचे असते आणि हे महत्वपूर्ण कार्य भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते करत आहेत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुकापूर येथे विविध विकासकामांच्या शुभारंभावेळी केले.

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून भगतवाडी घाटी आळी ते माथेरान रस्त्यापर्यंतचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. या रस्त्याचे उदघाटन तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे जिल्हा नियोजन निधीमधून मंजूर झालेल्या आंगण हॉटेल ते जरीमरी मंदिर रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी झाले. या वेळी उपसरपंच दिवेश भगत यांच्या जनसंपर्क तसेच डी.व्ही. भगत ॲण्ड सन्स या कार्यालयाचे उद्घाटनदेखील आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, सुनील पाटील, सरपंच ज्ञानेश्वर पाटील, सरपंच ज्योती केनी, उपसरपंच दिवेश भगत, रवि केनी,यतीन पाटील, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, महेश पाटील, दत्तात्रेय भगत, बुवा शेठ, अशोक पाटील, उदय म्हस्कर, सदस्य पुनम भगत, प्रमोद भगत, दीपक भगत, आत्माराम पाटील, पांडुरंग केनी, अंकुश पाटील, दिलीप भगत,नंदू भगत, विवेक पाटील, संदीप घरत, शशिकांत पाटील, नेताजी पाटील, आनंद म्हसकर, नामदेव शेठ पोपटा, आत्माराम पाटील, परशुराम पाटील, संजय पाटील, हिराबाई केनी, मंथलाल शर्मा, नितेश शर्मा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# किल्ले हे महाराष्ट्राचे वैभव, त्यांची राखण आपल्या सर्वांची जबाबदारी

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

किल्ले हे महाराष्टाचे वैभव आहेत आणि ते राखण आपल्या सर्वांची जबाबदारी आहे असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी किल्ले बांधणी स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभावेळी केले.महाराष्ट्राची शौर्य परंपरा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा गड–किल्लयांचा वारसा नव्या पिढी पर्यंत पोहोचवण्यासाठी पनवेल शहर भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने दिवाळीच्या निमित्ताने किल्ला बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ सोमवारी मिडल क्लास हौसिंगसोसायटीच्या मैदानात आमदार प्रशांत ठाकूर आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. मराठी संस्कृती,गौरवशाली इतिहास आणि स्वराज्य संकल्पना तरुणाईच्या मनात रुजवण्यासाठी हा उपक्रम दरवर्षीप्रमाणेयंदाही अभूतपूर्व प्रतिसादात संपन्न झाला. युवाशीला सकारात्मक दिशा देत, महाराष्ट्राचा तेजस्वी इतिहासजिवंत ठेवण्याच्या उद्देशाने भाजप युवा मोर्च्या पनवेल शहराने ही स्पर्धा आयोजित केली होती. यंदा स्पर्धेचेचौथे वर्ष होते. अत्यंत कलात्मकता, बारकाईने मांडणी आणि ऐतिहासिक तथ्यांचे प्रभावी सादरीकरण करत स्पर्धकांनी एकापेक्षा एक सरस किल्लयांच्या प्रतिकृती साकारल्या.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी मान्यवरांनी युवकांच्या कलात्मकतेला आणि त्यांनी घेतलेल्या मेहनतीबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले. यंदाच्या स्पर्धेत यशोपुरम मित्र मंडळ यांनी आपल्या सिंधुदुर्ग किल्ल२याच्या अप्रतिम प्रतिकृतीसाठी प्रथम क्रमांक पटकावला. तर शिव गौरव मित्र मंडळ यांच्यालोहगड प्रतिकृतीने द्वितीय क्रमांक मिळवला. कर्नाळा किल्ल२याची आकर्षक प्रतिकृती साकारणाऱ्या बाळ किल्ले शिलेदार यांना तृतीय क्रमांक देण्यात आला. तर पार्थ जगे यांच्या अजिंक्यतारा,स्वराज्य बाळ मित्र मंडळाच्या विशालगड,जय भवानी मित्र मंडळाच्या प्रतापगड,रजित शेटे यांच्या प्रतापगड,कट्टा परिवाराच्या विजयदुर्ग आणि गावदेवी मित्र मंडळाच्या कर्नाळा यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन सन्मानित करण्यातआले.

या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजपनेते जयंत पगडे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अजय बहिरा,गणेश कडू, सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका प्रिती जॉर्ज, रुचीता लोंढे, जिल्हा उपाध्यक्षमयुरेश नेतकर, युवामोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव, पनवेल शहर सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रितम उर्प पिंट्या म्हात्रे, पवन सोनी, रोहीतजगताप, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष हिमेश बहिरा, संदीप पाटील, अनिमेश ओझे, ममता प्रितम म्हात्रे,शुभंम कांबळे, कोमल कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



**उलवे नोड : सेक्टर ८मध्ये दीपावलीनिमित्त वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी त्यांनी रहिवाशांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास मयुरेश म्हात्रे, सचिन घरत माजी अध्यक्ष विजय घरत आदी उपस्थित होते.**

















**पनवेल : दिवाळीच्या पावन सणामध्ये दिवाळी अंक प्रकाशित करण्याच्या परंपरेनुसार अनेक दिवाळी अंकांचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या प्रकाशन सोहळ्यात पत्रकार राज भंडारे संपादित क्रांतिकारी भूमी, विशाल सावंत संपादित रायगड संदेश, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू संपादित वादळवारा, संतोष आमले संपादित दैनिक युवक आधार दिवाळी विशेषांक, सुनील वारगडा संपादित आपले रायगड, अप्पासाहेब मगर संपादित जनसभा, पत्रकार अनिल भोळे संपादित रसायनी टाईम्स, गणपत वारगडा संपादित आदिवासी सम्राट आणि अण्णासाहेब आहेर संपादित आदर्श माझा भारत या दिवाळी अंकांचे प्रकाशन करण्यात आले. दरम्यान, अनेक मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दिवाळीच्या शुभेच्छा देताना राष्ट्रवादीचे उरण तालुकाध्यक्ष परिक्षीत ठाकूर; सोबत माजी सरपंच जितेंद्र घरत, भाजपचे उरण शहर विभागीय अध्यक्ष राजेश गावडे उपस्थित होते.**



**पनवेल : शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर डॉ. पटवर्धन हॉस्पिटलजवळ विद्युतवाहिनीमध्ये स्पार्किंग झाले होते. माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी महावितरण तसेच महापालिका अग्निशमन विभागाला पाचारण करून परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे अनर्थ टळला.**


## जाहिर प्रसिद्धीकरण

खालील माहीती नमुद केली गेलेल्या बसची विक्री करण्यात येत आहे तर ट्रॅव्हल एजन्सी ह्यानी संपर्क साधावा.
तरी इच्छुक ठेकेदारानी आपली निविदा दिनांक २८/१०/२०२५ पर्यंत सोसायटी ई मेल वरती मेल करावयात.
greenwoodsocietyphase1gmail.com
MH46-H0704
मॉडेल सप्टेंबर–२०१६
डायसल – टाटा मार्कपोलो २३ सीटर

sd/- sd/- sd/-
Chairman Secretary Treasurer
GREENWOOD ESTATE PHASE - 1 CHS LTD.
Survey No. 10/4, 10/5, 11/3, 12/2, 13/3 & 16/3, Village - Hedutane, Post-Padghe, Tal. Panvel, Dist. - Raigad - 410 208.

## जाहिर प्रसिद्धीकरण

पुढे नमुद केलेली सोसायटी ग्रीन वूड फेज वन कानपोली हेदुटाणे ह्या सोसायटी मध्ये सोलर एनर्जी पॅनल बसवण्याचे आहे तरी इच्छुक सरकार मान्य ठेकेदारानी आपली निविदा दिनांक २८/१०/२०२५ पर्यंत सोसायटी ई मेल वरती मेल करावयात greenwoodsocietyphase1@gmail.com

sd/- sd/- sd/-
Chairman Secretary Treasurer
GREENWOOD ESTATE PHASE - 1 CHS LTD.
Survey No. 10/4, 10/5, 11/3, 12/2, 13/3 & 16/3, Village - Hedutane, Post-Padghe, Tal. Panvel, Dist. - Raigad - 410 208.



मांगल्याचे तेजस्वी दिवे प्रत्येक दारी उजळू दे,
लक्ष्मीच्या आगमनाने घर सुखाने भरू दे..
सर्वांना
दीपावली
सणाच्या तेजोमय
शुभेच्छा
शुभेच्छुक
अशोक धरमचंद ओसवाल
माजी उपनगराध्यक्ष,
कर्जत नगरपरिषद
भारतीय जनता पक्ष
पी डी गोल्ड कर्जत - रायगड




ग्रामस्थ मंडळ तोंडरे व श्री.महेश राघोशेठ पाटील
आयोजित
अनुभवा एक सुंदर अशी संगीतमय सकाळ
दिवाळी पहाट
गायक विशाल रसाळ
गायिका सोनल रसाळ
पखवाज वादक मधुकरबुवा धोंगडे
बुधवार दि.२२/१०/२०२५ रोजी सकाळी ६ वा.
ठिकाण :तोंडरे गाव, ता. पनवेल, जि. रायगड
प्रहेश राघोशेठ पाटील
अध्यक्ष : उद्योग आघाडी पनवेल तालुका उत्तर मंडळ




भारतीय जनता पार्टी,
आयोजित
दिवाळी संध्या २०२५
कामोठे येथे प्रथम...
सुश्राव्य संगीत मैफिल.....!
बुधवार, २२ ऑक्टोबर २०२५
संध्याकाळी ७:०० वा
स्थळ: लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा,सेक्टर -६ कामोठे
आर्या आंबेकर
राष्ट्रीय पुरस्कार विजेती
सुप्रसिद्ध गायिका
प्रवेश विनामूल्य
मोफत प्रवेशिका मिळण्याचे ठिकाण :
भाजपा पक्ष कार्यालय, - 12/13,
नंदनवन पार्क, सेक्टर - 36, कामोठे.
अधिक माहितीसाठी संपर्क :
विनोद खेडकर - 8779187815
प्रदीप भगत - 9819042957
तेजस जाधव - 9594945089
प्रशांत ठाकूर
आमदार - पनवेल विधानसभा




आनंदाचे गाणे गात दिवाळी येते अंगणात,
सुखाची मग होते बरसात, तेजाची मिळते साथ
ही दिवाळी आपणांस आनंदाची,
सुखसमृध्दीची जाओ..!
सर्वांना
दीपावली सणाच्या
तेजोमय शुभेच्छा
TIPL
शुभेच्छुक
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
Tel. : 022 27452713, 9769409120
Email : thakurinfraprojects@gmail.com
Web : www.thakurinfraprojects.in

# बळीराजाची दिवाळी शिवारात

## भातकापणी, झोडणीच्या कामात शेतकरी व्यस्त





**पाली : प्रतिनिधी**

भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणार्‍या रायगड जिल्ह्यात भातपिके आता डोलू लागली आहेत. त्यामुळे जिल्ह्यात भातकापणीच्या कामाला वेग आला आहे. दिवाळी असली तरी पावसाची भिती व मजुरांची कमतरता पाहता धान्य व्यवस्थितपणे आपल्या कणगीत पडावे यासाठी भात कापणी व झोडणीच्या कामात शेतकर्‍यांची लगबग सुरू झाली आहे, मात्र मंगळवारी सायंकाळी पावसाने हजेरी लावली.

मजुरांची कमतरता भासत असल्याने ऐन दिवाळीत शेतकरी कुटुंबातील सदस्य कापणी, झोडणी, बांधणीच्या कामात व्यस्त आहेत. परतीच्या पावसाचा फटका भातशेतीला बसू नये म्हणून शेतकरी मिळेल ते मनुष्यबळ वापरून दिवाळीतच कापणीची कामे आटपून घेत आहेत. ग्रामीण भागात आजही खळ्यावर मोकळ्या आकाशात झोडणीची कामे होतात. खळ्यामध्ये असलेला भात लवकरात लवकर पोत्यात भरून घरात आणून टाकण्याचे काम सुरू आहे. अनेक ठिकाणी कापणी, काढणीच्या कामाला वेळेत मजूर मिळत नसल्याने सधन शेतकरी यंत्राच्या वापराने कामे जलदगतीने आटपून घेत आहेत. यामध्ये श्रम, वेळ व पैसा बचत होत आहे.

दिवसेंदिवस मजुरीचे दर वाढल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. गोरगरीब शेतकर्‍यांना हे दर परवडणारे नसल्याने घरातील कुटुंबातील व अन्य नातेवाईक यांच्या मदतीने आळीपाळीने कापणी व झोडणीची कामे करीत आहेत. या कामात महिला मोठ्या प्रमाणावर सहभागी होताना दिसत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी भात झोडणीच्या कामात व्यस्त झाला असून ऐन दिवाळीत मळणी काढण्यासाठी भल्या पहाटे शेतात दाखल होत आहेत. भात कापणी, भात वाळवणे, पेंढ्याची उडवी रचणे या कामाला आता चांगलाच वेग आला आहे.

### सणामध्ये चार पैसे हाती

***दिवाळी सणामध्ये भात विकून चार पैसे खर्चायला मिळतील अशी आशा येथील शेतकर्‍यांना आहे. त्यामुळेच ऐन दिवाळीमध्ये शेतकरी आपल्या शेतामध्ये कापणी, झोडणी व इतर कामांसाठी उतरलेला दिसत आहे. या खटाटोपामध्ये त्याच्या दिवाळीच्या आनंदावर विरजण पडताना दिसत आहे, असे सुधागड तालुक्यातील शेतकरी शरद गोळे यांनी सांगितले.***

# मुंबई-पुणे महामार्गावर मोकाट गुरांचा मुक्तसंचार, चालक हैराण

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ म्हणजे मुंबई-पुणे महामार्गावर मोकाट गुरांचा सर्रास वावर सुरू आहे. त्यामुळे वाहनचालक हैराण झाले आहेत. वेळ प्रसंगी वाहतूक पोलीस या जनावरांना रस्त्यापासून दूर करण्याचा प्रयत्न करताना दिसतात.



अनेक ठिकाणी अद्याप भात कापणी बाकी असल्याचे दिसत आहे. त्यातच पावसाने अधूनमधून थैमान घातले असल्याने शेतकरी भीतीच्या सावटाखाली आहेत. पिकलेल्या शेतीची कामे अद्याप बाकी असताना काही शेतकर्‍यांनी त्यांची जनावरे मोकाट सोडली आहेत. या जनावरांना खाण्यासाठी खूप गवत, झाडपाला आहे, पण त्यांच्या नाकात प्लास्टिकचा वास मुरला असल्याने ते या मार्गावर असलेल्या हॉटेल, ढाबे या ठिकाणी येऊन प्लास्टिक खाताना दिसत आहे.

या प्लास्टिक पिशवीत उरलेले अन्न पदार्थ, फरसाण, वेफर्स असल्याने जनावरांचा ओढा ते खाण्याकडे जास्त असल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले. त्यामुळे मुंबई-पुणे महामार्गावर मोकाट गुरांचा सुळसुळाट झाला आहे.

नुकताच जनावरांचा अपघातात मृत्यू झाला. तरीही मालक आपली जनावरे सांभाळण्यास टाळाटाळ करतात. अशांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# सुधीर ठोंबरे यांच्याकडून आदिवासीवाड्यांमध्ये दिवाळी फराळ आणि शैक्षणिक साहित्य वाटप

**चौक : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी चौक परिसरातील आदिवासीवाड्यांमध्ये दिवाळी फराळ, मुलांना फटाके आणि शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांच्याबरोबर दिवाळी साजरी केली.

ठोंबरे हे नेहमी सामाजिक उपक्रम राबवत असतात. आपल्यासह सर्वांनी दिवाळी आनंदात साजरी करावी एवढाच हेतू असतो. सर्वांच्या चेहर्‍यावर आनंद दिसला पाहिजे, असे त्यांनी या वेळी सांगितले.



## खोपोलीतील शाळेत चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली डॉ. रामहरी धोटे शिशुमंदिर इंग्रजी माध्यम शाळेच्या कार्यालयाचा दरवाजा तोडून चोरट्याने ९९ हजार रुपये किमतीचा माल चोरल्याची घटना १६ ऑक्टोबर रोजी रात्री २च्या सुमारास घडली. चोरट्याने चेहारा कपड्याने झाकलेला असला तरी आरोपी सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

याबाबत माहिती मिळताच खोपोली पोलीस घटनास्थळी आले आणि त्यांनी शाळेतील सीसीटीव्हीचे फुटेज तपासले. चोरटा खोपोली रेल्वे स्टेशन येथून आल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून चोरट्याचा शोध सुरू आहे.

# आई कनकाई सामाजिक संस्थेकडून गोरगरिबांना कपडे आणि फराळ वाटप

**माणगाव : बातमीदार**

दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर आई कनकाई सामाजिक संस्थाने यंदाही आपली सामाजिक परंपरा कायम ठेवत गोरगरिबांना कपडे आणि फराळ वाटपाचा उपक्रम राबविला. संस्थेचे संस्थापक रायगडभूषण सुशील कदम यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम उत्साहात पार पडला.

याबद्दल कदम यांनी सांगितले की, दिवाळी हा आनंदाची सण आहे, पण समाजातील प्रत्येक घटकाला या आनंदात सहभागी करून घेणे ही खरी दिवाळी आहे. संस्थेच्या




कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन गरजू कुटुंबांना नवीन कपडे, फराळ आणि मिठाईचे वाटप केले. या उपक्रमात स्थानिक नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यात मंत्री भरत गोगावले आणि युवा नेते विकास गोगावले यांचे सहकार्य लाभले.

# खोपोली बाजारपेठेत प्लास्टिकबंदी जनजागृती रॅली

## कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर प्लास्टिकमुक्त आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश देण्यासाठी प्रसोल केमिकल्स लि., पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच पिल्लई एचओसी कॉलेज, मोहोपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली बाजारपेठेत प्लास्टिक पिशवी बंदी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रम अंतर्गत बाजारपेठेत नागरिकांना प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन करण्यात आले तसेच पर्याय म्हणून मोफत कापडी पिशव्या वाटप करण्यात आल्या. विशेष म्हणजे, पर्यावरण संवर्धनाचा हा संदेश खोपोली पोलीस ठाणे येथील कर्मचारीवर्गापर्यंत पोहचवण्यासाठी पोलीस दलालाही कापडी बॅगचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सचिन हिरे (पोलीस निरीक्षक, खोपोली पोलीस ठाणे), सुभाष पाटील (आयआर हेड, प्रसोल केमिकल्स लि.) उपस्थित होते तसेच अरुण गोविंद जाधव (अध्यक्ष, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट), अनिता म्हात्रे व कलावती उपाध्याय (शिक्षिका), राजेंद्र रिंगे, रवींद्र भोपी, पंकज राजपूत, निलेश जाधव यांच्यासह महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही जनजागृती रॅली खोपोली शहरातील नागरिकांना पर्यावरण संरक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात यशस्वी ठरली.




## विद्यार्थ्यांना उटणे बनविण्याचे धडे



**कर्जत : प्रतिनिधी**

महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर या विद्यालयातील विद्यार्थ्यांना माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानच्या वतीने ज्योवीस आयुर्वेदिक हॉस्पिटल दादर-मुंबई आणि उषा कृष्णा फाउंडेशन, नेरळ यांच्या सहकार्याने आयुर्वेदिक उटणे तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

महिला मंडळाच्या सभागृहात उटणे तयार करण्याच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रतिष्ठानच्या मनीषा सुर्वे, ज्योवीस आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या डॉ. ज्योती सातपुते, वंदना भोसले, महिला मंडळाच्या कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर, मुख्याध्यपिका स्नेहा गाढे, श्रद्धा मुंढेकर आदी उपस्थित होत्या. मुख्यध्यापिका गाढे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात उपक्रमाचा उद्देश सांगितला.

डॉ. ज्योती यांनी आयुर्वेदिक उटणे कसे तयार करायचे याचे प्रात्यक्षिक सादर करून प्रत्येक विद्यार्थ्याला ते तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यानंतर तयार झालेले उटणे विद्यार्थी व शिक्षकांना मोफत वाटप केले. या प्रसंगी प्रेमा पितळे, मेघा पिंगळे, स्मिता गणवे, आरती कोकरे, माधुरी देशमुख, सुप्रिया भासे, शारदा राठोड, सुषमा सुपे, वृषाली आदी शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

# साळाव बिर्ला गणेश मंदिर भक्तांचे श्रद्धास्थान अन् पर्यटकांचे आकर्षण

रायगड जिल्हा हा ठाणे, पुणे, मुंबई व रत्नागिरी जिल्हांना जवळचा जिल्हा आहे. अशा या जिल्ह्यातील मोजक्याच तालुक्यांना समुद्रकिनारा लाभला आहे. त्यातील मुरूड तालुका म्हणजे प्रति गोवा मानले जातो आणि वनडे पिकनिकसाठी पर्यटकांचे खास आकर्षण आहे. काही वर्षांपूर्वी मुरूड तालुक्यात साळाव येथे बिर्ला उद्योग समूहाने विक्रम वसाहत प्रकल्पानजीक संजयनगरकडील छोट्याशा टेकडीवर विक्रम विनायक मंदिर बांधले. हे मंदिर अल्पावधीत भक्तांचे श्रद्धास्थान आणि पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्धीस आले आहे.



रोहा-रेवदंडा कुंडलिका खाडीलगत व रेवदंडा-रोहा मुख्य रस्त्यावरील साळाव गावानजीक छोट्याशा टेकडीवर बिर्ला समूहाने हे विक्रम विनायक मंदिर पंरपरेने बांधले आहे. मंदिर राजस्थान व गुजरात मेथील संगमवरी दगडातून उभारलेले आहे. मुंबईच्या शापुरजी मालनजी बिल्डर्सनी भव्य व दिव्य असे बांधकाम केले आहे.

टेकडीवर मंदिराकडे जाण्याकरिता पायर्‍या व मोटार रस्ता असे दोन मार्ग आहेत. टेकडीच्या पायथ्यांशी दोन सुंदर सिंह शिल्पे आहेत. मंदिराचे बांधकाम दोन सभामंडप व गर्भगृह अशा प्रकारचे असून सभामंडपाचे छत संपूर्णपणे पारदर्शक आणि चारी बाजूंना सभामंडप खुला आहे. मुख्य गाभार्‍यास श्री विनायकाची भव्य संगमवरी मूर्ती आहे. या मूर्तीसोबत शंकर-पार्वती, दुर्गा माता, रिद्धीसिद्धी, राधाकृष्ण व सूर्यदेवाचीही मूर्ती आहे. सर्व मूर्ती जयपूरहून आणलेल्या कसबी कारागिरांनी घडविल्या असून आकाशात उंच सुळक्यासारख्या जाणार्‍या शुभ्र संगमवरी कळसामुळे मंदिराची शोभा विशेषत्वाने वृद्धींगत झालेली आहे.

मंदिर म्हटले की पूजा अर्चा आलीच. या मंदिरासाठी वृंदावन मेथून खास दोन पुजारी आणले आहेत. सकाळी सहा ते साडेअकरा आणि सायंकाळी साडेचार ते नऊ या वेळेत भक्तांना मंदिरात प्रवेश दिला जातो. मंदिर परिसरात रमणीय बाग असून बागेत सायंकाळी छान विद्युत रोषणाई पहावयास मिळते. मुळातच निसर्गरम्य असलेल्या या परिसरात शोभा वाढविणारे हे मंदिर निर्सगाशी एकरूप झालेले दिसते. बागेमध्ये स्व. आदित्य बिर्ला यांचा पुतळा आहे. बागेत कांरजे असून तेही विद्युत रोषणाईत अधिकच प्रेक्षणीय झाले आहे.

मुंबई, पुणे, रत्नागिरी अशा अनेक शहरातून भाविक व पर्यटक येथे येत असतात विशेषतः संकष्ट चतुर्थीसारख्या धार्मिक महत्वाच्या दिवसासह रविवारी व अन्य सुट्टीच्या दिवशी पर्यटकांसह भाविकांचे मोठे लोंढे येतात. विशेष म्हणजे सर्वधर्मीय नागरिक दर्शन घेतात. मंदिरामुळे स्थानिकांना व्यवसाय निर्माण झाला आहे. या परिसरास दिवसभर पुण्याच्या सारसबागेसारखे स्वरूप प्राप्त झाले आहे. येथील ऑटोरिक्षा, सितारा व्हॅन यांनाही पर्यटकांमुळे उद्योगधंदा मिळाला आहे. मंदिराच्या समोरील भागात रसवंतीगृह, खाद्यपदार्थांचे विविध स्टॉल, छोटी उपाहारगृहे, नारळ व फुलांच्या हातगाड्या, चणे, फुटाणेवाले ते स्थानिक परिसरातील भाजी विक्रेते, फळ विक्रेते या सर्वांना व्यवसाय निर्माण झाला आहे. प्रकल्पाने मंदिरासमोरील भागात खासगी बस वाहनासाठी वाहनतळ उभारला आहे, मात्र वाहनांची आवक पाहता तो आता अपुरा पडत आहे. पर्यायाने वाहने रस्त्यावर उभी करावी लागत असल्याने ट्रॅफिक समस्या निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अलिबाग आगाराच्या दिवसभरात तुरळक बसफेर्‍या या मार्गावर धावतात. मुरूड, पेण, रोहा, महाड, कर्जत, श्रीवर्धन, बस आगारातूनही बिर्ला विनायक मंदिराकडे पर्यटन बससेवा सुरू करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

मंदिराच्या प्रवेशव्दाराजवळ दोन ते चार सुरक्षा अधिकारी ठेवण्यात आले असून त्या ठिकाणी भक्तमंडळीच्या सामानाची तपासणी होते. सामान ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केलेली असून परवनागीशिवाय कोणालाही छायाचित्र काढता येत नाही. केवळ मासिक, साप्ताहिक, दैनिक आदी प्रसिध्दी माध्यमातून काम करणार्‍यांना छायाचित्र काढण्यास परवानगी आहे, मात्र त्यासाठी सुरक्षा अधिकारीवर्गाकडे संपर्क साधावा लागतो.

असे हे बिर्ला मंदिर एकदिवसीय निसर्गरम्य पर्यटनक्षेत्र बनलेले व भाविकांचे श्रध्दास्थान आर्थिक व वेळेच्या दृष्टीने सोयीचे स्थळ आहे. प्रत्यक्ष भेट दिल्यावर मनाला आनंद नक्कीच मिळतो.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# तेजोमय दिवाळी! आकर्षक दिवे, पणत्यांना मागणी

**पाली : प्रतिनिधी**

झगमगणाऱ्या विद्युत रोषणाईच्या युगातही दिवाळीच्या पारंपरिक मातीच्या दिव्यांचे आणि पणत्यांचे महत्त्व आजही अबाधित असल्याचे दिसत आहे. यंदाच्या दिवाळीसाठी पारंपरिक दिव्यांसोबतच विविध प्रकारचे आकर्षक दिवे व पणत्यांना ग्राहकांकडून मोठी मागणी आहे. त्यामुळे बाजारपेठेत चैतन्याचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण. या सणानिमित्त घरोघरी पारंपरिक दिव्यांची रोषणाई करण्याची प्रथा आहे. गेल्या काही वर्षांपासून बाजारपेठेत चिनी बनावटीच्या विद्युत माळांचा आणि लखलखत्या रोषणाईचा प्रभाव वाढला असला तरी शीतल व मंद प्रकाश देणाऱ्या मातीच्या पणत्यांचे आकर्षण कायम आहे. विद्युत रोषणाईमुळे घरांना आधुनिक रूप येत असले तरी दिव्यांमुळे मिळणारा पारंपरिक आणि धार्मिक आनंद व सात्विकता काही औरच असते, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

यंदा दिवाळीसाठी बाजारात विविध प्रकारच्या आकर्षक पणत्या दाखल झाल्या आहेत. यामध्ये साध्या मातीच्या पणत्यांपासून ते रंगीत, नक्षीदार, मोती आणि टिकल्यांनी सजवलेल्या पणत्यांचा समावेश आहे. तसेच, फुलवाती ठेवण्यासाठी विशेष डिझाइन केलेल्या, हँडल असलेल्या, तसेच पाण्यात तरंगणाऱ्या पणत्यांनाही ग्राहकांकडून विशेष मागणी आहे. यासोबतच, मोर, बदक, कमळ अशा विविध आकारांतील दिवे, तसेच चिनी माती आणि धातूच्या पणत्या देखील उपलब्ध आहेत.

स्थानिक कारागिरांनी गेल्या काही महिन्यांपासून पणत्या बनवण्याचे काम सुरू केले होते. त्यांच्या पारंपरिक कलेतून साकारलेल्या पणत्या आजही पर्यावरणपूरक मानल्या जातात. या पणत्यांच्या खरेदीमुळे स्थानिक कारागिरांना रोजगार मिळतो, या जाणिवेने अनेक ग्राहक आवर्जून या पणत्यांची खरेदी करत आहेत. याबरोबरच अनेक परप्रांतीय व्यावसायिक हातगाडी तसेच रस्त्याच्या कडेला विविध प्रकारच्या पणत्या व दिवे विक्रीसाठी बसलेले दिसतात.

**गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पणत्यांना चांगली मागणी आहे. लोकांना आता आपल्या मातीच्या आणि पारंपरिक वस्तूंबद्दल प्रेम वाटू लागलं आहे. अनेक ग्राहक खास डिझाइनर पणत्यांची आणि लहान मुलांसाठी आकर्षक आकारातील दिव्यांची मागणी करत आहेत. यामुळे आमच्या कलेला व पोटाला आधार मिळतो.**

**-नारायण बिरवाडकर, कुंभार व्यावसायिक, पाली**


मांगल्याचे तेजस्वी दिवे प्रत्येक
दारी उजळू दे, लक्ष्मीच्या
आगमनाने घर सुखाने भरु दे..!
सर्वांना
दीपावली सणाच्या
तेजोमय शुभेच्छा
सौजन्य : श्री.अविनाश कोळी (जिल्हाध्यक्ष, उत्तर रायगड)


स्नेहाचा सुगंध दरवळला
आनंदाचा सण आला
एकच मागणे दिवाळी सणाला
सौख्य, समृद्धी लाभो
सर्वांना..!
दिपावली,
भाऊबिजेनिमित्त तमाम
रायगडवासियांना
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. प्रकाश
अर्जुनराव देसाई
भाजप नेते, रायगड


दिवाळी म्हणजे
महापर्व आनंदाचं
दिवाळी म्हणजे स्वागत
आनंदी जीवनाचं...
सर्वांना
दीपावली
सणाच्या
तेजोमय शुभेच्छा!
शुभेच्छुक
किरण खंडू ठाकरे
कर्जत विधानसभा
निवडणूक प्रमुख (भाजपा)


। अंगण सजले फुल आणि रांगोळ्यांनी,
स्वागत करण्यास दिवाळीसणाची ।
।। तोरणे आकाश कंदिल लागले दारी,
आली दिवाळी आपुल्या घरी ।।
दीपावली
निमित्त आपणांस व आपुल्या परिवारास
मंगलमय शुभेच्छा..!
रईस रमजान कादरी
जिल्हाध्यक्ष, भाजपा अल्पसंख्याक मोर्चा
( दक्षिण रायगड )